महाराष्ट्र टाइम्स मरीन ड्राइव्ह POINT

शनिवार, १९ मार्च २०११

# सत्यं, शिवं, सुंदरम !

डॉ.तुषार यशवंत सावडावकर

बाणगंगा तलावाच्या परिसरात अनेक मंदिरं पाहायला मिळतात. अशाच काही पुरातन मंदिरांची आज ओळख करून घेऊ.

### रामेश्वर शिव मंदिर

१८४२ मध्ये चिऱ्यांच्या दगडातलं एक सुंदर मंदिर राघोबा जिवाजी जयकर यांनी बांधलं. हेच पुढे रामेश्वर शिव मंदिर म्हणून नावारुपाला आलं. या मंदिराचा गाभारा अतिशय पवित्र व प्रसन्न असून तो १५ फूट लांब आणि १२ फूट रुंद आहे. मंदिरात पश्चिमेला शिवलिंग असून त्याच्या बाणाचा भाग उत्तरेला आहे. त्याला तांब्याचं आवरण बसवलेलं आहे. गाभाऱ्यामध्ये पार्वतीची दगडाची सुबक मूर्ती आहे. या मंदिरात दगडाचा अडीच फूट उंचीचा नंदी आहे. सभामंडपासमोर कासवदेखील आहे. सभामंडप २३ फूट लांब आणि १२ फूट रुंद आहे. या मंदिराची सजावट संगमरवरी दगडाने केलेली असून मंदिराच्या प्रवेशद्वारी पितळेच्या घंटा बांधण्यात आल्या आहेत. या मंदिरात महाशिवरात्र तसंच श्रावणी सोमवार, श्रावणी अमावस्या, त्रिपुरी पौर्णिमा इत्यादी धार्मिक उत्सव साजरे केले जातात.

### गणपती मंदिर

या गणेश मंदिराचं बांधकाम राघोबा जिवाजी जयकर यांच्याचमार्फत करण्यात आलं. या मंदिरातली गणपतीची संगमरवरी मूर्ती पश्चिमाभिमुख असून तिला चार हात आहेत. ती अडीच फूट उंच आहे. या राजस्थानी पद्धतीचं कोरीव काम केलं आहे. गाभारा १० फूट उंच असून मंदिराच्या बाहेरदेखील ४० फूट जागा प्रदक्षिणेसाठी ठेवलेली आहे. या मंदिरात श्री गणेश जयंती तसंच इतर अनेक उत्सव साजरे केले जातात.

## देवळांच्या गावा...

### लक्ष्मी-नारायण मंदिर

हे मंदिर लक्ष्मी व विष्णू देवतांचं असून मूर्ती पश्चिमाभिमुख आहेत. हे मंदिर एका व्यापाऱ्याने पत्नी केसरबाई हिच्या स्मरणार्थ १८९० मध्ये बांधलं. मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ 'जय' 'विजय' यांचे पुतळे असून ते विजयाचे प्रतीक आहेत. त्यांच्या हातात तलवार आणि ढाल असून ते सिंहाच्या समोर थांबलेले आहेत. मंदिराच्या गाभाऱ्यात श्री लक्ष्मी व श्री विष्णूच्या संगमरवरी प्रतिमेच्या बाजूला चांदीचा पाळणा ठेवलेला आहे. यांचं दर्शन घेतल्यास सर्व इच्छा पूर्ण होतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

### ओमकारेश्वर मंदिर

हे मंदिर पूर्वाभिमुख असून मंदिराची रचना गोलाकार आणि घुमटासारखी आहे. हे मंदिर मथुरादास द्वारकादास यांनी बांधलं. या मंदिराचं प्रवेशद्वार लाकडी असून त्यावर सुंदर नक्षीकाम केलं आहे. गाभाऱ्याच्या आतल्या बाजूला स्वयंभू शिवलिंग पाहायला मिळतं. या पिंडीची रोज मनोभावे पूजा करणाऱ्याच्या सर्व इच्छा पूर्ण होतात अशी भाविकांची श्रद्धा आहे. गाभाऱ्यात पार्वतीची दगडी मूर्ती असून तिची उंची एक फूट तीन इंच आहे. गाभाऱ्याच्या बाहेर नंदीची दगडाची मूर्ती असून तिचं तोंड गाभाऱ्याच्या दिशेला आहे.

### विठोबा-रखुमाई मंदिर

हे मंदिर पश्चिमाभिमुख असून भवानी सुता सांधू या संन्याशाने बांधलं, असं म्हटलं जातं. १९१२ मध्ये शेठ गंगाराम तागीतदास या व्यापाऱ्याने त्याची पुनर्बांधणी केली. मंदिरात विठोबा-रखुमाईच्या काळ्या पाषाणाच्या मूर्ती असून त्यांची उंची साधारणतः एक फूट आहे. के. रघुनाथ यांच्या मते १८९० च्या अखेरीपर्यंत या मंदिराला घुमट होता. देवळाच्या बाहेर महादेवाची पिंडी तसंच शितलादेवीची प्रतिमा होती. आता ती बघायला मिळत नाही. सध्या या मंदिराची व्यवस्था पुरोहित कुटुंब बघतात.



mtartedit@gmail.com





